| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- III, पिंपरी चिंचवड.**<br>पत्ता :- २ रा मजला, एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणे, पीसीनटीडीए सर्कल, सेक्टर नं.७, स्पाईन रोड, भोसरी, पुणे ४११०२६ | |

**<u>प्रेस नोट दि. ०६/०७/२०२४</u>**

## <u>पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची उल्लेखनीय कामगिरी</u>

### बांगलादेशी इसमांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे मिळविलेले ४२ भारतीय पासपोर्ट रद्द करण्यात मिळविले यश...

दहशतवाद विरोधी शाखा, पिंपरी चिंचवड यांनी मिळालेल्या गोपनिय बातमीच्या आधारे निगडी पो.स्टे. हद्दीत साईनाथनगर याठिकाणी भारतामध्ये अनधिकृतरित्या वास्तव्यास असणाऱ्या ५ बांगलादेशी नागरिकांचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द निगडी पो.स्टे. गुन्हा रजि. नं. २०/२०२४ परकिय नागरीक १९४८ चे कलम १४, पासपोर्ट अधि. १९६७ चे कलम ३, ६, पारपत्र (भारतामध्ये प्रवेश) १९५० चे कलम ३ (अ) प्रमाणे दि.२१/०१/२०२४ रोजी गुन्हा दाखल करुन सदर बांगलादेशी घुसखोरांना अटक केली होती. त्याबाबतचा पुढील तपास निगडी पो.स्टे.चे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री. अंबरिष देशमुख यांनी केला.

त्यामध्ये करण्यात आलेल्या सखोल तपासामध्ये सदर ५ बांगलादेशी आरोपींव्यतिरिक्त आणखी काही बांगलादेशी नागरिकांनी नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेल्या एजंटच्या मार्फतीने बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय पासपोर्ट बनविल्याचे आढळून आल्याने त्याबाबत तपास अधिकारी सपोनि देशमुख यांनी दहशतवाद विरोधी शाखा व परदेशी नागरिक नोंदणी विभाग, विशेष शाखा-२ यांचे मदतीने प्रादेशिक पासपोर्ट ऑफीस, पुणे येथे पत्रव्यवहार करुन त्यांना सदर बाबत पुर्ण माहिती देवून बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांचे आधारे प्राप्त केलेले एकुण ४२ पासपोर्ट रद्द करण्यासाठी विनंती केली. त्यानुसार प्रादेशिक पासपोर्ट ऑफिस, पुणे यांनी सदर बाबत पडताळणी करुन पुढील कायदेशीर कार्यवाही करुन सदरचे ४२ भारतीय पासपोर्ट रद्द केले बाबत दि. २/७/२०२४ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

याप्रमाणे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून केलेल्या कामगिरीमुळे एकुण ४२ बनावट पासपोर्ट एकाच वेळी रद्द करण्यात यश आले आहे. सदरची उल्लेखनिय कामगिरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त मा.श्री.विनय कुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त मा.श्री.वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, मा.श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मा.श्रीमती स्वप्ना गोरे व डॉ.शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परि- III तथा नियंत्रण अधिकारी ए.टी.बी. यांचे मार्गदर्शनाखाली श्री. नितीन लांडगे, पोलीस निरीक्षक, परकिय नागरिक नोंदणी विभाग, विशेष शाखा-२, दहशतवाद विरोधी शाखा, पिंपरी चिंचवड येथील अधिकारी व अंमलदार तसेच निगडी पो.स्टे. कडील तपास अधिकारी सपोनि श्री. अंबरिष देशमुख यांनी केली आहे.

**( डॉ. शिवाजी पवार )**
पोलीस उप आयुक्त,
परि- III तथा नियंत्रण अधिकारी
ए.टी.बी., पिंपरी चिंचवड.